# ख्रिस्ती मिशनऱ्यांचे कार्य आणि साहित्य धर्मांतराला प्रवृत्त करते का ?

***विश्वास गोरखनाथ वळवी,***
संशोधक विद्यार्थी
*सामाजिक शास्त्रे प्रशाळा,इतिहास विभाग,*
*कबचौउमवि,जळगाव,*

**प्रस्तावना :-**

**ज्या** काळात जातीव्यवस्था मजबूत आणि दृढ होती,भारतीय समाजव्यवस्थेत फक्त विशिष्ट वर्गालाच शिक्षणाचे आणि आरोग्याचे वारसाहक्क देण्यात आले होते, तळागाळातील सामान्य जनतेला जातीयतेच्या नावाने वागणूक दिली जात होती, अशा काळात ख्रिस्ती मिशनऱ्यानी भारतीय समाजसुधारणेचा एक नवीन अध्याय आरंभ केला.शिक्षण आणि आरोग्याच्या माध्यमातून दलित-पिडीत लोकांना आपल्या हक्काची जाणीव करून दिली.आणि त्यांना समानतेचा कायदा मिळवून देण्यात मोलाची कामगिरी बजावली.तसेच भारतीय समाजसुधारकांना एक वाट मोकळी करून दिली. **उदा-फुले दापत्य,महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी अहमदनगरच्या मिस क्लारा ब्रूस यांच्याकडे शिक्षण,आरोग्य आणि समाजसेवेचे धडे घेतले. महात्मा फुले यांनी पुण्याच्या ख्रिश्चन स्कॉटिश इग्रजी शाळेत १८४१ ते १८४७ या काळात माध्यमिक शिक्षण पूर्ण केले.आणि त्यानंतर १८४८ ला पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली.तसेच १८५४ ला काही काळ पुण्याच्या ख्रिश्चन स्कॉटिश इग्रजी स्कूलमध्ये एक शिक्षक म्हणून नौकरी हि पत्करली.त्याअगोदर अहमदनगर आणि कोलकाता येथे शिक्षणाच्या अनेक शाळा ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या प्रयत्नांनी काढल्या होत्या.सांगायचा मुद्दा एवढाच कि ख्रिस्ती मिशनऱ्यांचे कार्य आणि साहित्य हे समाजाला उपयुक्त,समाजभिमुख आणि भारतीय देशाला बळ देणारे होते.**विल्यम कॅरी यांनी जेव्हा चाळीस भाषेत साहित्य निर्माण केले,तेव्हा त्यांनी फक्त धर्मांतरित लोकांसाठीच नाही तर संपूर्ण भारतीय बंधुसाठी ते कार्य केले.ते कार्य आधुनिक भारताचा बांधणीसाठी होते.

**ख्रिस्ती साहित्याचे विवेचन :-**

*'येशू ख्रिस्ताला नित्तीमत्तेचा सूर्य म्हणून ओळखले जाते आणि त्यामुळे जेव्हा त्याच्या शुभवर्तमानाच्या मिशनचा भारताच्या पूर्वोत्तर राज्याच्या क्षितिजावर उदय झाला तेव्हा ह्या राज्याचे तेज कित्येक पटींनी वाढले आहे. आज या प्रांतात जी प्रगती पाहतो ती मिशनरींनी ढाळलेल्या अश्रू व घामामुळे घडून आलेली आहे"*

नारायण वामन टिळक यांना धर्मांतरामुळे जेव्हा जातबाह्य करण्यात आले तेव्हा त्यांनी **धर्मांतरण म्हणजे देशांतरण नव्हे** या शीर्षकाखाली लेख लिहून सांगितले कि **हे धर्मांतर नाही तर हृदयांतर** मी भारतीयच आहे,फक्त माझे **स्वभावपरिवर्तन झाले आहे धर्मपरिवर्तन नाही.**

त्यामुळे धर्मांतराच्या नावावर आपली पोळी शेकून घेणारे आणि धर्मांतराचा नावाखाली ख्रिस्ती मिशनरी आणि त्यांच्या भारतातील अमूल्य योगदानावर काळिमा फासणारे तसेच संविधान न मानणारे असे भरपूर लोक भारतीय समाजव्यवस्थेत आपले प्राबल्य पाडून आहे.आणि आपल्या हक्काची मागणी करणाऱ्या खऱ्या बुद्धीवंत लोकांना दाबून ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहे. **ख्रिस्ती साहित्य हे धर्मांतर करणारे साहित्य आहे का? ख्रिस्ती मंडळ्या आणि ख्रिस्ती व्यक्ती या प्रश्नाचे उत्तर कसे देतो यावर ख्रिस्ती साहित्याची विश्वासहर्ता टिकून आहे.पण प्रश्न हा पण आहे की या प्रश्नाचे उत्तर एक ख्रिस्ती साहित्यिक अथवा ख्रिस्ती व्यक्ती म्हणून मला माहीत आहे का? अन्यजातीचे लोक नेहेमी ख्रिस्ती धर्मावर धर्मांतराचे आरोप लावून त्यांच्यावर कार्यवाही करण्यास तत्पर असतात. अशा वेळी एक ख्रिस्ती म्हणून मला ख्रिस्ती साहित्य,पवित्रशास्त्र आणि भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्ष या शब्दाचे संपूर्ण ज्ञान असणे अत्यंत गरजेचे आहे.**

**एक संशोधक म्हणून मी ख्रिस्ती साहित्य म्हणजे काय? याची व्याख्या अशी करेन :-** *“जे शब्दलेखन पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनास अधीन राहून,पवित्रशास्त्र वचनाचे प्रकटीकरण प्राप्त करून आणि इतर ख्रिस्ती साहित्य वाचून समाजाच्या आध्यात्मिक आणि भौतिक कल्याणार्थ लिहिले जाते,त्याला ख्रिस्ती साहित्यलेखन असे म्हटले जाते.”* ख्रिस्ती मिशनरी त्यांचे सामाजिक कार्य आणि साहित्य हे भारतीय समाजाला अशा काळात कामी आले जेव्हा त्याची नितांत गरज होती.भारतीय समाज ब्रिटीश सत्तेचा अधीन होता.ब्रिटीशांची नीती भारताची आर्थिक पिळवणूक तर ख्रिस्ती **मिशनऱ्यांची** नीती भारतीय समाजात आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक प्रबळता आणून भारताला स्वर्गाचे स्वरुप देण्याची होती.म्हणून फेड्रिक **मेक्स्मुल्लर** म्हणतात “ **जर पृथ्वीवर कोठे स्वर्ग असेल तर ते हिंदुस्थानात आहे”** जवळ-जवळ दोनशे बारा वर्षे ख्रिस्ती मिशनऱ्यांना ब्रिटिशांनी भारतात येण्याची बंदी केली होती.काही लोकांना वाटते ब्रिटीश सत्ता आणि ख्रिस्ती मिशनरी एक होते.पण तसे अजिबात नाही.विल्बरफोर्स या समाजसुधारकाने इंग्लंडमध्ये आंदोलन केले.आणि म्हणून १८१३ च्या चार्टर अक्टने ख्रिस्ती मिशनरी यांना भारतात धर्मप्रचाराची मुभा बहाल करण्यात आणि पण ? ती देखील शिक्षण आणि आरोग्याच्या माध्यमातून. त्यामुळे ख्रिस्ती मिशनरी आणि त्यांचे साहित्य हे भारतीय इतिहासाचाच एक भाग आहे,ते धर्मांतराचा नावावर डावलून अजिबात चालणार नाही.

फादर थॉमस स्टिफन्स यांनी जवळ-जवळ एक हजार ओवीत ख्रिस्तपूराणाची रचना केली केव्हा ? १६१६ ला, विल्यम कैरी यांनी जवळ-जवळ चाळीस भारतीय भाषेत साहित्याची निर्मिती केली,त्यात शब्दकोश, अनुवादीत ग्रंथ, विज्ञान, इतिहास, तत्वज्ञान,बायबल इत्यादी घटक सापडतील ते केव्हा घडून आले १८०० व्या शतकात,मॉल्सवर्थ, थॉमस कॅन्डी, विल्यम जोन्स, जीगनबाल्ग , नारायण वामन टिळक,बाबा

पद्मनजी,पंडिता रमाबाई.यांनी भारतीय समाज हा वाईट प्रथा आणि आर्थिक पिडवणुकीत बाहेर कसा येईल,त्यांना आपल्या अधिकारांची जाणीव कशी होईल,म्हणून साहित्य लिहिले.ख्रिस्ती **मिशनऱ्यांनी** भारतीय समाजाला आरोग्य आणि शिक्षण देऊन त्यांना शिक्षित केले,त्यांच्यात सुधारणा घडवून आणल्या.आज आधुनिक काळातील ख्रिस्ती साहित्यिक हाच इतिहास पुन्हा साहित्याच्या माध्यमातून निर्माण करीत आहे,हा भारतीय इतिहास आहे,हा भारतीय ख्रिस्ती मिशनरी चळवळीचा इतिहास आहे,जो ख्रिस्ती लेखक आणि साहित्यिक लिहीत आहे,तो भारतीय इतिहासासच एक भाग आहे,मग तो धर्मांतरित करणारा कसा असू शकतो?

**सर्वप्रथम मी भारताचा एक नागरिक आहे आणि मला त्या प्रत्येक गोष्टीचे स्वातंत्र्य आणि मूलभूत अधिकार प्राप्त झालेले आहे**,जे येथील हिंदू,मुस्लिम,शीख यांना आहे,म्हणून एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून मला माझ्या धर्मावरील चांगल्या आणि वाईट गोष्टी लिहिण्याच्या संपूर्ण अधिकार आहे.दुसरी गोष्ट भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे.येथे धर्माच्या नावावर दिन-दुबळ्या लोकांत सामाजिक आणि आर्थिक सुधारणा करण्यासाठी प्रत्येक धर्माला अधिकार आहे. आणि ख्रिस्ती धर्म चर्चमार्फत हे कार्य करीत असतो. त्यामुळे हे कार्य संविधानिक असून ते धर्मांतराला प्रवृत्त करणारे कार्य नाही.ख्रिस्ताचा संदेश हा गरीब आणि दलित पीडित लोकांसाठी आहे. तो समाजाचा प्रत्येक अंगाला स्पर्श व्हावा म्हणून ख्रिस्ती साहित्याची निर्मिती करण्यात आली.

**जे लोक धर्मांतराचे आरोप करतात, त्यांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यावे.**भारतात पहिला छापखाना ख्रिस्ती लोकांनी काढला? उत्तर आहे पोर्तुगीजांनी,१५५६ मध्ये कॅथोलिक पाद्रींनी गोव्यात पहिला छापखाना काढला आणि **दोत्रीना क्रिस्ता** हि पुस्तिका छापून मुद्रणयुगाची सुरुवात केली.पुढे विल्यम कॅरी याने कोलकाता आणि जीगनबाल्ग याने सेहेरामपूर येथे छपाईयंत्राची सुरुवात करून भारतात साहित्याची एक नवीन क्रांती घडवून आणली.भारतात साहित्याची सर्वात पहिली निर्मित ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केली,विल्यम जॉन्स याने गीतेचा पहिला इंग्रजी अनुवाद,पहिला शब्दकोश मोल्सवर्थ याने लिहिला आणि कॅन्डी बंधूने त्याला मदत केली,सतीप्रथा, बालविवाह, केशवपन, या प्रथाविरोधात सर्वप्रथम आंदोलन विल्यम कॅरी याने बंगालमध्ये केले.त्याच्यापासून प्रेरणा घेऊन मग राजा राममोहन रॉय याने कायदीक दृष्ट्या पुढे प्रयत्न केले.मध्ययुगीन कालखंडात ख्रिस्ती साहित्याची निर्मित झाली, पवित्र गीता, ज्ञानेश्वरी,आणि भारतीय इतिहास या घटकांची इंग्रजीत अनुवाद करून ख्रिस्ती मिशनऱ्यांनी साहित्याचे एक नवीन दालन आधुनिक भारताचा सुरुवातीचा काळात रोवून दिला.या प्रश्नाचे उत्तर धर्मांतराचे आरोप करणारे का देत नाही?

**भारतात पाणिनी यांनी व्याकरणाची सुरुवात केली असली तरी त्याला मूर्त स्वरूप विल्यम कैरी ,जी ए ग्रायर्सन, इ बर्जेस यांनी दिली.** भारतात शब्दकोशाची सुरुवात विल्यम कैरी ८५०० शब्दसाठा केली,भारतात गद्य ग्रँथांची

सुरुवात सिहांसन बत्तीसी १८१४,पंचतंत्र १८१५,हितोपदेश १८१५ ,जोसुवा मार्शमन आणि विल्यम कैरी यांनी केली,पहिले आत्मचरित्र बाबा पद्मनजी *अरुणोदय*, पहिले प्रवासवर्णन पंडिता रमाबाई 'माझा इंग्लंडचा प्रवास'१८८३ आणि अमेरिकेचा प्रवास १८८६ शब्दबद्ध केला.हे लिखाण युरोपियन मिशनरी आणि भारतीय मिशनरी यांनी लिहिले असून ते धर्मांतराला प्रवृत्त करणारे नसून,भारतात नवीन युग आरंभ करणारे होते.आणि ते भारताचा स्वातंत्र्यासाठी राष्ट्रवाद उत्पन्न करणारे ठरले. भारतीय राष्ट्रवादात युरोपीय मिशनऱ्यांचे ख्रिस्ती साहित्याचे मोलाचे योगदान आहे.विल्यम जोन्स यांनी बेंगोल एशियाटिक सोसायटीची स्थापना करून फक्त ख्रिस्ती साहित्यच नाही तर भारतातली वेद-पुराण आणि धार्मिक साहित्य इंग्रजीमध्ये अनुवादित करून प्रकाशित केले.आणि भारताची महान संस्कृती आणि परंपरा जगाला अवगत करून दिली.त्यामुळे ख्रिस्ती साहित्य हे धर्मांतराला प्रवृत्त करते हे म्हणणे संपुर्णपणे चुकीचे ठरते

**भारतीय संविधान कलम ११ जातीव्यवस्था नाहीसे करते.भारतीय संविधान प्रत्येक जाती,वंश,धर्म,वर्ग,प्रदेश इत्यादी गोष्टीचे स्वातंत्र्य बहाल करते आणि म्हणून ते धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे.**ख्रिस्ती धर्म आणि त्यांच्या अनुयायांना देखील हे कलम लागु होतेआणि भारताचा प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य आहे.की ते कोणत्याही धर्माचे पालन करू शकतात.त्यामुळे धर्मांतराचा नावाखाली आपण त्यांच्या मूलभूत अधिकारांवर गदा आणू शकत नाही.

त्याप्रमाणे **कलम २१ हे प्रत्येक नागरिकाला भारतात राहून जगण्याचे अधिकार देते.**पण हे जगणे कसे असायला हवे? तर संविधानिक असायला हवे.ख्रिस्ती धर्म आणि त्यांचे अनुयायी यांना देखील हा अधिकार आहे.त्यामुळे त्यांना ख्रिस्ती साहीत्य आणि लेखन करून आपली मते मांडण्याच्या संपूर्ण अधिकार आहे.आणि हे मते समाजाला उपयोगी पडणारे असले तर त्यावर आक्षेप आणणे संपूर्ण चुकीचे आहे. भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला एक माणूस म्हणून जीविताची हमी देते,तो कोणत्या वर्गाचा आहे हे बघून देत नाही.त्यामुळे मी एक प्रामाणिक नागरिक म्हणून भारताचे प्रतिनिधित्व करत असतो.

**डॉ वर्गीस कुरियन*** म्हणतात ***"साहित्य क्षेत्रातील अधिकतर भारतीय भाषांना गद्य नव्हते या नात्याने बायबलातील काही भागांचे भारतीय मातृभाषेत प्रकाशन करून ह्या ख्रिस्ती सेवकांनी भारताला गद्य पद्धतीचा परिचय करून दिला.अनेक भारतीय भाषांमध्ये पहिली कांदबरी, नाटक,प्रवासवर्णन किंवा आत्मचरित्र हे या सेवकांनी प्रकाशित केलेले आहेत.भाषा शास्त्र, भाषांचे विज्ञान हे सुद्धा या सेवकांचेच योगदान आहे.तसेच ह्या विकासामुळे बालवाडी ते विश्वविद्यालयापर्यंत शिक्षणाचा प्रसार झाला आहे."*** भारतीय ख्रिस्ती साहित्य हे भारतातच निर्मित झाले आणि भारतीय साहित्याच्या क्षेत्रात त्याचे अमूल्य योगदान विसरता येत नाही.त्यामुळे त्याला धर्मांतरित करणारे साहित्य सांगणे मूर्खपणाचे ठरेल.कारण ते भारतातच

निर्माण झाले आणि भारताचाच समाजसुधारणेसाठी ते कारणीभूतही झाले.मी हे नाही म्हणत कि संपूर्ण भारत हे ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या साहित्याने उभे राहिलेले आहे,पण त्यांच्याही साहित्याचा अमूल्य वाटा आहे.आणि तो वाटा धर्मांतर करणारा नाही,तर भारताच्या विकासासाठी कारणीभूत ठरलेला वाटा आहे,त्याला धर्मांतराचा नावाखाली दडवू नका.

**ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आणि त्यांच्या साहित्याने भारतीय लोकांत राष्ट्रप्रवृती जागृत केली** भारतातील हिंदी,उर्दू, मराठी आणि संस्कृत भाषेतील साहित्य ज्यात भारतातील धर्म, इतिहास, तत्वज्ञान,विज्ञान,संस्कृती आणि परंपरा समाविष्ट होते ते ख्रिस्ती मिशनऱ्यांनी गोळा करून त्यावर आधुनिक पद्धीतीने भाष्य करून ते साहित्य संपूर्ण जगाला ज्ञात करून दिले.तेव्हा त्यांनी ख्रिस्ती धर्मातील तत्वे नाहीशी होतील यावर विचार केला नाही.तर पवित्र गीता आणि वेद यांचे श्रेष्टत्व इतिहासात समाविष्ट करून दिले. जेम्स मिल या युरोपीयन इतिहासकाराने जरी भारतीय संस्कृतीला असंस्कृतपणाचे उदाहरण म्हटले असले तरी आपल्यांना हे विचारात घेणे अगत्याचे ठरते कि,तो एक साम्राज्यवादी लेखक होता आणि त्याने ब्रिटीश सत्तेचे प्रतिनिधित्व स्वीकारले होते.

भारतीय संस्कृतीचे खच्चीकरण करून भारतीय लोकांना राष्ट्रप्रवृती पासून परावृत्त करणे,ब्रिटीश सत्तेचा आणि मिलचा उद्देश स्पष्ट दिसून येतो.त्याउलट ख्रिस्ती मिशनरी यांना १६०० ते १८१३ म्हणजे २१२ वर्षे भारतात येण्याची बंदी स्वतः ईस्ट इंडिया कंपनीने लावून ठेवली होती.निष्कर्ष एकच निघते कि ख्रिस्ती मिशनरी यांनी भारतातील सामान्य लोकांचा राष्ट्रवाद जागृत केला ? तर,ब्रिटीश सत्तेचे आणि जेम्स मिल्स यांनी भारतीय सामान्य जनतेचा जो राष्ट्रवाद दाबून भारताची जी आर्थिक पिळवणूक केली होती.तिचे पितळ उघडे पडेल.त्यामुळे भारतीय ख्रिस्ती साहित्य हे धर्मांतराला प्रवृत्त करणारे नव्हते उलट ते सुधारणावादी होते.जे अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकाला दिशादर्शक देणारे ठरले. **श्री भास्कर सोज्वळ** म्हणतात " **ख्रिस्ती साहित्य सत्यम,शिवम,सुंदरम या कसोटीला उतरले पाहिजे जीवनाशी निष्ठा आणि प्रामाणिकपणा,पवित्र्याने मंडित आणि सोन्दर्याने नटलेले साहित्य म्हणजे ख्रिस्ती साहित्य होय."** ख्रिस्ती मिशनऱ्यांचे साहित्य हे भारतीय राष्ट्रवादाशी निष्ठा राखणारे आणि भारतीय समाजाचा उद्धारासाठी पूरक असे ठरले.ख्रिस्ती साहित्य सत्यम,शिवम आणि सुंदरम या कसोटीला पूर्णपणे उतरले आहे.यात कोणत्याच प्रकारची शंका उपस्थित करण्याचे कारण नाही.आणि जे शंका उपस्थित करतात त्यांनी ख्रिस्ती साहित्य समजून घ्यावे आणि संविधान वाचावे.

**आधुनिक ख्रिस्ती साहित्याचा वसा घेऊन चालणारे अनेक मराठी ख्रिस्ती साहित्यिक आहे**.फादर थॉमस स्टीफन्स,विल्यम कैरी, रॉबर्ट. डी.नोबिली,फादर हेन्री हेरास हे मध्ययुगीन कालखंडातील ख्रिस्ती रत्ने तर त्यापासून प्रेरणा घेऊन चालणारे आधुनिक ख्रिस्ती साहित्यिक

नारायण वामन टिळक,पंडिता रमाबाई,स.ना.सूर्यवंशी आणि उत्तराधुनिक ख्रिस्ती साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो,अनुपमा उजगरे,डॉ सुभाष पाटील,कामिल पारखे,जोसेफ तुक्सानो,सिसलीया कार्व्हालो,अनिल दहिवाडकर, अतुल अघमकर,सायमन मार्टिनइत्यादी आहेत. **फादर फ्रान्सिस दिब्रिटो हे मराठी ख्रिस्ती साहीत्याचे कर्ते आणि आधुनिक महाराष्ट्राचे फादर थॉमस स्टीफन्स आहेत**.आपले योगदान ख्रिस्ती साहित्यात तर दिलेच पण आज ते ९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले.***धर्म आणि ख्रिस्ती साहित्यावरून जरी काही दगडाचे थेंब त्यांच्यावर पडले तरी एक गोष्ट स्पष्ट झाली की त्यांचे साहित्य धर्मांतराला प्रवृत्त करणारे नाही,तर समाजाला दिशा देणारे आहे,आधुनिक साहित्याची उंची गाठणारे आहे,साहित्याच्या माध्यमातून धर्म,वंश, प्रदेश, आणि जात मिटविणारे आहे.*** म्हणून ख्रिस्ती साहित्य आणि कार्य धर्मांतराला प्रवृत्त करते हे पूर्णपणे चुकीचे आणि खोटे आहे

**संदर्भग्रंथ सूची:-**


१) जे.सी.देव.अरुणोदयम,ब्रदरन इको २०१६, पृ.क्र-१०१
२) भारताकडून आम्ही इग्लंडने काय शिकावे.मक्स्मुल्लर.अनु.श्री.अ.भावे.वरदा प्रकाशन २००८
३) ख्रिस्तपुराण.फादर थोमस स्टीफंस. संपा.फा.कारीदाद द्रागो.पाप्युलर प्रकाशन. १९९६
४) अहमदनगर जिल्हातील ख्रिस्ती साहित्यकांची साहित्य सेवा.सौ मंगला खंडागळे.चेतक बुक्स प्रकाशन.२०१४